# कलम 4(1) अ व ब नुसार बाब क्र 2न्वये
# अ क्षेत्रिय कार्यालय, स्थापत्य निगडी -44
# कार्यालयीन अधिकारी व कर्मचारी यांचे अधिकारांचा तपशील

## अ) कार्यकारी अभियंता

| अधिकार |
|---|
| नेमून दिलेल्या कार्यक्षेत्रातील स्थापत्य विषयक कामांचे नियोजन करून संपुर्ण वर्षाचे अंदाजपत्रक तपासणी करून मंजुरीसाठी सादर करणे स्थापत्य विषयक कामे अमलात आणणे |
| अंदाजपत्रकीय र.रू. 10 लाख व त्या पुढील गणनापत्रकांना तांत्रिक मान्यता देणे, निविदा मागविण्याची निविदा मंजुरीसाठी अथवा रद्द करणेसाठीची कार्यवाही करणे निविदा र.रू 10 लाख व पुढील कामाचे आदेश देणे चालू असलेल्या कामाची पाहणी व तपासणी करणे र.रू. 10 लाखाच्या पुढील विकास कामाची देयके मंजुर करणे |
| i) नियंत्रणाखालील अधिकारी व कर्मचारी यांनी नेमणूक कर्तव्यामध्ये कसुर केल्यास महाराष्ट्र नागरी सेवा नियमावली ननुसार दंडात्मक अथवा शास्ती प्रस्तावीत करणे |

## ब) उपअभियंता

| अधिकार |
|---|
| i) नेमून दिलेल्या कार्यक्षेत्रातील स्थापत्य विषयक कामांचे नियोजन करून संपुर्ण वर्षाचे अंदाजपत्रक तपासणी करून मंजुरीसाठी सादर करणे. |
| ii) विकास कामाचे अंदाजपत्रक तपासणी करणे निविदा कार्यवाहीसाठी आवश्यक कागदपत्रांची तपासणी करणे कामाचे आदेश प्राप्त झाल्यानंतर कामाचे नियोजन करून प्रत्यक्ष जागेवर काम चालू असताना स्थानिक परिस्थीतीनुसार व कामाचे नियोजनसार कामाची देयके तपासणे. |
| iii) महाराष्ट्र गुंठेवारी विकास नियमाधिन करणे श्रेणीवाढ व नियंत्रण अधिनियम सन 2001 अन्वये गुंठेवारी पद्धतीने झालेल्या अनाधिकृत भुखंड व बांधकामे ही नियमाधिन करणेसाठी अथवा फेटाळण्यासाठी प्रस्तावीत करणे |
| iv) नेमूण दिलेल्या कार्यक्षेत्रीतील स्थापत्य विषयक भांडवली / महसुली स्वरूपाच्या विकास कामावर देखरेख ठेवणे व झालेल्या कामाची देयके पुढील कार्यवाहीसाठी सादर करणे |

## क) कनिष्ठ अभियंता

| अधिकार |
|---|
| 1) नेमूण दिलेल्या कार्यक्षेत्रातील स्थापत्य विषयक नविन तसेच दुरूस्ती विषयक भांडवली, महसुली स्वरूपाच्या विकास कामाची वार्षीक अंदाजपत्रक तयार करणे |
| 2) नेमूण दिलेल्या कार्यक्षेत्रातील स्थापत्य विषयक भांडवली, महसुली अंदाजपत्रक तयार करणे |
| 3) आदेश प्राप्त झालेल्या कामाचे स्पेसीफीकेशननुसार प्रत्यक्ष जागेवर ठेकेदाराचे कामकाजावर नियंत्रण ठेवणे तसेच झालेल्या कामाची मोजमापे घेवून देयके तयार करणे |
| 4) नेमून दिलेल्या कार्यक्षेत्रातील स्थापत्य विषयक प्राप्त तक्रारीचे निवारण करणे |
| 5) मनपाच्या विविध विकास कामाच्या प्रशासकीय मान्यतेसाठी नस्तीच्या छाननी विषयक कामे करणे |
| 6) स्थापत्य विषयक विकास कामाचे रोजचे रोज साईटचे पर्यवेक्षण करणे मानांकनाप्रमाणे काम करून घेणे, तक्रारी निरस्त करणे, दंड नोटीस प्रस्तावीत करणे |
| 7) मा. शहर अभियंता कार्यालयातील तांत्रिक व इतर माहिती व पत्रव्यवहार इत्यादी तसेच मा. शहर अभियंता यांचे नियंत्रणाखाली कामकाज करणे |

## स्थापत्य अभियंत्रिक सहाय्यक

| अधिकार |
|---|
| नेमून दिलेल्या कार्यक्षेत्रातील स्थापत्य विकास कामाचे रोजचे रोज साईट पाहणी करणे साईटवरील कामकाज गुणवत्ता पुर्वक करून घेणे साईटवर आलेल्या अडी अडचणींचे वरिष्ठांचे सल्ल्याने निराकरण करणे |

## मुख्य लिपीक

| अधिकार |
|---|
| सादर झालेल्या प्रकरणांवर कायद्यातील तरतुदी नियम नोंदविणे कायद्यातील तरतुदीनुसार प्रकरणे प्रस्ताव बरोबर आहेत किंवा नाही याची तपासणी करणे व लिपीक कर्मचाऱ्यांवर नियंत्रण ठेवणे |
| आलेल्या प्रकरणांबाबत वस्तुजन्य प्रस्ताव सादर करणे |
| रेकॉर्ड संभाळणे, विहीत नमुन्यात अभिलेख तयार करणे |
| वरिष्ठांचे सुचनेनुसार कामकाज करणे |

## वाहनचालक/ शिपाई / मजुर

| |
|---|
| कार्यालयीन कामकाज |